सकाळ
सोलापूर, गुरुवार,
२३ जुलै २०१५

# 'किर्लोस्कर-वसुंधरा'त चित्रपटांची मांदियाळी

## महोत्सवाचे आज उद्‌घाटन; 'शून्य कचरा' आहे महोत्सवाचा विषय

**सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर, ता. २२ : किर्लोस्कर-वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवास उद्यापासून (गुरुवार) सुरवात होत आहे. रविवारपर्यंत (ता. २६) चालणाऱ्या या महोत्सवात वेगवेगळे चित्रपट दाखविण्यात येणार आहेत. 'शून्य कचरा' हा यंदाच्या महोत्सवाचा मुख्य विषय असल्याची माहिती मनुष्यबळ विकास विभागाचे वरिष्ठ सरव्यवस्थापक डॉ. एस. पी. वैद्य यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महोत्सवाचे उद्‌घाटन उद्या (गुरुवारी) दुपारी अडीच वाजता सोलापूर विद्यापीठात होणार आहे. त्या वेळी डॉ. प्रमोद पाटील यांचे व्याख्यानही होणार आहे. त्याचदिवशी सायंकाळी सहा वाजता निर्मलकुमार फडकुले सभागृहात छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन होणार आहे. हे प्रदर्शन सायंकाळी आठ वाजेपर्यंत सुरू राहील. शुक्रवारी (ता. २४) सकाळी आठ वाजता चार पुतळा येथून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात येणार आहे. त्याचदिवशी सकाळी आठ वाजता शून्य कचरा व पर्यावरण या विषयावर चित्रकला स्पर्धा फडकुले सभागृहात होणार आहेत. सायंकाळी पाच ते साडेसात या वेळेत वेगवेगळे चित्रपट दाखविले जाणार आहेत. त्याचबरोबर सायंकाळी साडेसात वाजता वसुंधरामित्र पुरस्काराचे वितरण अनिल कर्वे यांच्या हस्ते होणार आहे. त्याचबरोबर चित्रकला स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांनाही पुरस्कार दिले जातील. त्या वेळी कर्वे यांचे 'अर्बन वेस्ट मॅनेजमेंट' या विषयावर व्याख्यान होणार आहे. शनिवारी (ता. २५) सकाळी सात ते नऊ या वेळेत डॉ. कोटणीस स्मारक येथे 'वॉक फॉर हेरिटेज' हा कार्यक्रम होईल. सायंकाळी पाच ते नऊ या वेळेत फडकुले सभागृहात चित्रपट दाखविले जातील. रविवारी (ता. २६) सायंकाळी पाच ते नऊ या वेळेत समारोपाचा कार्यक्रम फडकुले सभागृहात होईल. या वेळी अरुण देशपांडे यांना अनिल अवचट यांच्या हस्ते वसुंधरा सन्मान पुरस्कार दिला जाईल. त्याचबरोबर 'पर्यावरणीय आणीबाणी' या विषयावर अनिल अवचट यांचे व्याख्यान होईल, असेही डॉ. वैद्य यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेस वीरेंद्र चित्राव, अमोल चाफळकर, बाबूराव पेठकर, नरेंद्र काटीकर, डॉ. वासुदेव रायते, ऋषीकेश कुलकर्णी उपस्थित होते.